**पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११०१८.**

**मा.क प्रभाग समिती सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक- ६**

**स भा वृ त्तां त**

**दिनांक ३-८-२०१६ वेळ-सकाळी ११.३० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यामा. “क” प्रभाग समिती मासिक सभा बुधवार दि.३/०८/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) **मा.शितोळे शैलजा बाबुराव** **सभापती**
२) मा.ननवरे जितेंद्र बाबा
३) मा.सावळे सिमा रविंद्र
४) मा.भोसले राहूल हनुमंतराव
५) मा.पालांडे सुजाता सुनिल
६) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
७) मा.कदम सदगुरु महादेव
८) मा.गिता सुशिल मंचरकर
९) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१०) मा.गायकवाड संध्या सुरदास
११) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१२) मा.शेंडगे आशा सुखदेव
१३) मा.मोटे किरण बाळासाहेब
१४) मा.सतिश सदाशिव काटे स्विकृत सदस्य

याशिवाय मा.दिलीप गावडे - क्षेत्रीय अधिकारी, मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी, प्रशांत पाटील-कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.जयंत बरशेट्टी-कार्यकारी अभियंता पापु, मा.पोरेड्डी-उपअभियंता, मा.शशिकांत दवंडे- उपअभियंता पापु, मा.विशाल कांबळे- उपअभियंता स्था.,मा.शिंदे-उपअभियंता, मा.वायकर- उपअभियंता, मा.दिलीप धुमाळ- उपअभियंता विदयुत,मा.सोनवणे-उपअभियंता विदयुत,श्री.उगले-लेखाधिकारी, श्री.शेख- कनिष्ठ अभियंता पापु, श्रीमती वंदना- क.अभियंता, श्री.रमेश भोसले,श्री.बेद - मुख्य आरोग्य निरीक्षक हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

-------

**मा.सभापती**- उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक १) एच.ए.कॉलनीमध्ये मुलभूत सुविधा देणेबाबत- मा.अमिना पानसरे,मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-२) नामकरण करणेसंदर्भात- मा.जितेंद्र ननवरे,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-३) नामकरण करणेसंदर्भात- मा.जितेंद्र ननवरे,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-४) दापोडी गणेशनगर येथील ईडब्ल्यूएस अंतर्गत मनपाकडे ताब्यात असलेल्या इमारतीला मोठया व्यासाची (१२”) ड्रेनेज लाईन टाकणेबाबत- मा.जितेंद्र ननवरे,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-५) प्रभाग क्र.४१ गांधीनगर मधील पुलास नाव देण्याबाबत- कैलास कदम, सदगुरु कदम, मा.जितेंद्र ननवरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-६) मासुळकर- नेहरुनगर चौकास कै.रतन भरतु चरण चौक नांव देण्याबाबत- मा.अमिना पानसरे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-७) स्वच्छ भारत मिशन (नागरी) व स्वच्छ महाराष्ट्र मिशन (नागरी) अंतर्गत प्रभाग हगणदारीमुक्त जाहीर करणेबाबत.

विषय क्रमांक-८) प्रभाग क्र.६४ दापोडी-बोपखेल मधील सर्वे नं.२८५९ मध्ये रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ नुसार घोषित करणेबाबत- मा.संजय काटे,मा.चंद्रकांता सोनकांबळे,मा.गिता मंचरकर,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

-------

दिनांक ७/७/२०१६ रोजी झालेल्या (कार्यपत्रिका क्रमांक ५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक- १८७ विषय क्रमांक- १
दिनांक-३/८/२०१६ विभाग-
सुचक- मा. सदगुरु कदम अनुमोदक-मा.अमिना पानसरे
संदर्भ- मा. सदगुरु कदम, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.

हिंदुस्थान अँटिबायोटिक्स (एच.ए.) कंपनीच्या मालकीची कामगारांसाठीची औदयोगिक वसाहत ही प्र.क्र. ४० खराळवाडी भागात समाविष्ठ आहे.सदर भागातील नागरिक हे प्र.क्र.४० चे मतदार आहेत. एच.ए.कंपनीची आर्थिक स्थिती खराब असल्याने सदर कंपनीने एच.ए.वसाहतीमध्ये मुलभूत सेवासुविधा पुरविण्याकरिता महापालिकेस विनंती केली आहे. तरी या भागात महापालिकेतर्फे सेवासुविधा पुरविण्यात याव्यात तसेच सदर कामाकरिता २०१६-१७ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकात लेखाशिर्ष निर्माण करुन त्यात ५००००००/- तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक- १८८ विषय क्रमांक- २
दिनांक- ३/८/२०१६ विभाग-
सुचक- मा. जितेंद्र ननवरे अनुमोदक-मा. राहूल भोसले
संदर्भ- मा.जितेंद्र ननवरे,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.३७ मधील महात्मा फुलेनगर शेजारील मो.जा.क्र.५० येथील उदयानास **"श्री श्री सदगुरु सिध्दलिंगेश्वर महाराज"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक- १८९ विषय क्रमांक- ३
दिनांक- ३/८/२०१६ विभाग-
सुचक- मा. जितेंद्र ननवरे अनुमोदक-मा. राहूल भोसले
संदर्भ- मा.जितेंद्र ननवरे,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.३७ मधील महात्मा फुलेनगर मधील झो.नी.पु.मार्फत बांधण्यात येणा-या समाजमंदीरास **"भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम बालभवन"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक- १९० विषय क्रमांक- ४
दिनांक- ३/८/२०१६ विभाग-
सुचक- मा. जितेंद्र ननवरे अनुमोदक- मा. सदगुरु कदम
संदर्भ- मा. सतिश काटे,मा मा. जितेंद्र ननवरे, मा. सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६२ मधील दापोडी गणेशनगर येथील गणेश किनारा सोसायटीत EWS अंतर्गत मनपाच्या ताब्यात असलेल्या इमारतीची ड्रेनेज लाईन ६' इंचाची असुन ती अपुरी पडत असल्याने आरोग्याची समस्या निर्माण झाली आहे.

तरी त्याठिकाणी त्वरीत १२' इंच व्यासाची ड्रेनेजलाईन टाकण्यात यावी.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- १९१ विषय क्रमांक- ५
दिनांक- ३/८/२०१६ विभाग-
सुचक- मा. सदगुरु कदम अनुमोदक-मा. जितेंद्र ननवरे
संदर्भ- मा. कैलास कदम,मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.४१ गांधीनगर मधील खालील पुलास नांव देण्यात यावे.

१) मुंबई पुणे महामार्गावरील पिंपरी चौकातील भूयारी मार्गास "**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भूयारी मार्ग**" असे नांव देण्यात यावे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक- १९२ विषय क्रमांक- ६
दिनांक- ३/८/२०१६ विभाग-
सुचक- मा. अमिना पानसरे अनुमोदक-मा. सुजाता पालांडे
संदर्भ- मा. अमिना पानसरे,मा.सौ.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

मासुळकर-नेहरुनगर चौकास "**कै.रतन भरतू चरण चौक**" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक- १९३ विषय क्रमांक- ७
दिनांक- ३/८/२०१६ विभाग-
सुचक- मा. सदगुरु कदम अनुमोदक-मा. किरण मोटे
संदर्भ- मा. क्षेत्रीय अधिकारी क यांचे जा.क्र.कक्षे/आ१५ब/कावि/९२६/२०१६ दि.३/८/२०१६

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-----

स्वच्छ भारत मिशन (नागरी) व स्वच्छ महाराष्ट्र मिशन (नागरी) अंतर्गत प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे प्रभाग क्र.५९ (मधुबन) या प्रभागामध्ये नागरिक उघडयावर शौचास जात असल्याचे दिसून येत नाही.यास्तव प्रभाग क्र.५९ (मधुबन) प्रभाग हगणदारीमुक्त जाहिर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक- १९४ विषय क्रमांक- ८
दिनांक- ३/८/२०१६ विभाग-
सुचक- मा. गिता मंचरकर अनुमोदक-मा. राहूल भोसले
संदर्भ- मा. संजय काटे, मा.चंद्रकांता सोनकांबळे, मा. गिता मंचरकर,मा. राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ६४ दापोडी-बोपखेल मधील सर्वे नं.२८५९ मध्ये रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ नुसार घोषित करणे.

सदर प्रभाग पिं.चिं.म.न.पा.च्या कार्यक्षेत्रातील क क्षेत्रीय विभागाअंतर्गत येत आहे. सर्वे नं.२८५९ मधुन नागरीकांच्या सोयीसाठी रस्ता घोषीत करणे आवश्यक आहे.

सदर सर्वे नं.२८५९ जागेभोवतालचा परिसर आधुनिकरणाने व नागरीकरणाने विकसित झाला असून,नागरीकांच्या दळणवळणाच्या सोयीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ नुसार घोषित करणेत येऊन तात्काळ रस्ता बनविणेत यावा यांस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(**मा.शितोळे शैलजा बाबुराव**)
सभापती
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - २६.
क्र-कक्षेका/कावि/८६ /२०१६.



दिनांक- १६/०८/२०१६

प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभाशाखा
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

